पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १३

**सभावृत्तांत**

**दिनांक - १६/०९/२०२१** **दुपारी - २.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **गुरुवार** दिनांक **१६/०९/२०२१** रोजी दुपारी २**.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील मा.सभापती शिक्षण समिती यांचे दालनात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जुलै २०२० व २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते.

**१. मा. पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.सारीका शिवाजी सस्ते
३. मा.बारसे प्रियांका प्रविण
४. मा.वाघमारे अश्विनी विक्रम

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.संदिप खोत - उप आयुक्त मा.पराग मुंढे सहा.शिक्षणाधिकारी व मा.डी.एन.गराडे लेखाधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**दि.१८/०८/२०२१ व दि.०२/०९/२०२१ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१२) चा सभावृतांत कायम करण्यात आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

उपस्थित सनमा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागांतर्गत २ इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये रिक्त शिक्षक जागा मानधनावर भरणे बाबत.

मा. सारीका सस्ते मा.बारसे प्रियांका यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना Goole Classroom Microsoft Teams, Zoom,Whatsapp हे तंत्रज्ञान व माध्यमे वापरण्याचे शिक्षण ग्लोबल एज्युकेशन अड टेक्रॉलॉजी सोल्यूशन्स यांच्या मार्फत ऑनलाईन प्रशिक्षण थेट पध्दतीने देणे बाबत.

मा. सारीका सस्ते व मा.वाघमारे अश्विनी यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व माध्यमिक शाळेतील इ५ वी ते इ. १० वी तील विध्यार्थ्यांना सुंदर हस्ताक्षर करिता मे.स्पार्कल क्लासेस यांच्या मार्फत सुंदर माझे अक्षर हे पुस्तक थेट पध्दतीने खरेदी करणे बाबत..
मा. सारीका सस्ते व मा.पवार मनिषा यांचा प्रस्ताव.

---------

सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्र. ५५ विषय क्र.०१
दि.१६/०९/२०२१
सुचक - मा. सारीका सस्ते अनुमोदक - मा.बारसे प्रियांका
संदर्भ- मा. सारीका सस्ते मा.बारसे प्रियांका यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागांतर्गत भोसरी व चिंचवड हया दोन इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत. दिनांक १ सप्टेंबर २०२१ च्या संच मान्यतेनुसार मनपा भोसरी इंग्रजी माध्यम शाळेत शिक्षकांच्या एकूण १९ जागा मान्य असून सध्या कार्यरत ९ शिक्षक असून एकूण १० शिक्षक रिक्त आहेत तसेच मनपा चिंचवड इंग्रजी माध्यम शाळेत शिक्षकांच्या एकूण १८ जागा मान्य असून सध्या कार्यरत ५ शिक्षक असून एकूण १३ शिक्षक रिक्त आहेत. सदरच्या दोन्ही मनपाच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत रिक्त असलेल्या जागेवर शिक्षक मागणी शाळेतील मुख्याध्यापक तसेच शिक्षक संघटनानी वारंवार केलेली आहे. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागांतर्गत भोसरी व चिंचवड हया दोन इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये संच मान्यतेनुसार रिक्त असलेल्या शिक्षक पदावरील जागा मानधनावर भरण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृतांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

-------------

ठराव क्र. ५६ विषय क्र.०२
दि.१६/०९/२०२१
सुचक - मा. सारीका सस्ते अनुमोदक - मा.वाघमारे अश्विनी
संदर्भ- मा. सारीका सस्ते मा. वाघमारे अश्विनी यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये येणाऱ्या विद्यार्थांना अनेक प्रकारच्या अडचणींचा सामना करायला लागतो. विद्यार्थांना चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळावे म्हणून महानगरपालिका अनेक प्रकारे शैक्षणिक उपक्रम व शिक्षण पूरक साहित्य विध्यार्थ्यांना उपलब्ध करून देत असते.सध्या कोविड १९ मुळे उद्भवलेल्या

परिस्थिति मुळे सर्व माध्यमिक व प्राथमिक विद्यार्थ्यांचे ऑनलाइन पद्धतीने शिक्षण चालू आहे. सदर ऑनलाइन शिक्षण आधुनिक तंत्रज्ञान वापरुन Google Classroom, Microsoft Teams, Zoom, Whatsapp इत्यादि माध्यमातून देणे शक्य आहे. हे तंत्रज्ञान व माध्यमे वापरण्याचे शिक्षण अथवा प्रशिक्षण पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षकांना देणेत आलेले नाही. सदर प्रशिक्षण अत्यंत आवश्यक असून ते सर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना ग्लोबल एज्युकेशन अँड टेक्नॉलॉजी सोल्यूशन्स यांच्या मार्फत ऑनलाइन प्रशिक्षण थेट पद्धतीने देणेत यावे. पहिल्या टप्प्यात ५०० शिक्षकांसाठी प्रती शिक्षक कर वगळून र.रू. २०००/- या प्रमाणे रू. १० लाख अधिक कर या मर्यादेत थेट पद्धतीने राबविणे यावा. पुढील कार्यवाही साठी ग्लोबल एज्युकेशन अँड टेक्नॉलॉजी सोल्यूशन्स यांचा प्रस्ताव आयुक्तांच्या मान्यतेसाठी पाठविणेस व प्रशिक्षण देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

---------------------

ठराव क्र. ५७ विषय क्र.०३

दि.१६/०९/२०२१

सुचक - मा. सारीका सस्ते अनुमोदक - मा.पवार मनिषा

संदर्भ- मा. सारीका सस्ते मा. पवार मनिषा यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व माध्यमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व माध्यमिक शाळेतील विद्यार्थीचे हस्ताक्षर सुंदर होणेकरिता “मे.स्पार्कल क्लासेस” यांच्यामार्फत सुंदर माझे अक्षर हे पुस्तक खरेदी करणेबाबत प्रस्ताव कार्यालयास सादर केलेला आहे. सदरच्या एका पुस्तकाची किमत र.रु. ९८/- आहे. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व माध्यमिक शाळेतील इ. ५ वी ते इ. १० वी तील एकूण ८२१५ विद्यार्थांना सुंदर हस्ताक्षर करिता “मे.स्पार्कल क्लासेस” यांच्यामार्फत सुंदर माझे अक्षर हे पुस्तक थेट पद्धतीने खरेदी करण्यात यावे. सदरच्या उपक्रमास र.रु. ८,०५,०७०/- खर्च अपेक्षित आहे. त्यासाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यतेसाठी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( पवार मनिषा प्रमोद )**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४३९/२०२१
दिनांक : १७/०९/२०२१



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.